अवैध दारूस प्रतिबंध घालण्यासाठी समिती
पुनर्गठीत करण्याबाबत..

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय-सीआरएम २००४/प्र.क्र. ६०८/पोल-११**
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०००३२
दिनांक : ११ मे, २०२६

**वाचा :-**

(१) शासन परिपत्रक क्र. सीएलएल ११०१/सीआर-१/भाग-२/इएक्ससी-२. दिनांक ६ डिसेंबर, २००२
(२) शासन परिपत्रक, क्र.सीआरएम २००४/६०८/पोल-११, दिनांक ५ जुलै, २००४
(३) गृह विभाग, क्र.सीआरएम २००४/६०८/पोल-११, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: २३ फेब्रुवारी, २००५
(४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. कार्यशा.२०२५/प्र.क्र. ०६/म-८, दिनांक ०९ एप्रिल, २०२५

**प्रस्तावना:-**

अवैध दारु निर्मिती व विक्रीवर पायबंद घालण्यासाठी शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रके निर्गमित केली आहेत. त्यानूसार अवैध दारु धंद्यांच्या अनुषंगाने काढलेल्या आदेशांचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी तसेच या अवैध धंदयांना परिणामकारकपणे आळा घालण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र. ३ अन्वये तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली होती, परंतू संदर्भ क्र. ४ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अधिनस्त गठीत केलेल्या अभ्यास गटाच्या शिफारशीनूसार महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ९३ नूसार दारूबंदी विषयक प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांचे असल्याने सदर कायद्यास अनुरूप प्रस्तुत समिती करण्याच्या अनुषंगाने संदर्भीय क्र. ३ चा शासन निर्णय अधिक्रमीत करून सदर समितीचे पुनर्गठन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानूसार सदरील समिती पुनर्गठीत करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

तालुकास्तरीय अवैध दारूस प्रतिबंध घालण्यासाठी समिती पुनर्गठीत करण्याच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर अध्यक्षतेखाली गठित केलेल्या अभ्यास समितीने केलेल्या शिफारसी व त्यानुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन खालीलप्रमाणे समितीची रचना प्रस्तावित करण्यात येत आहे :

१. उपविभागीय दंडाधिकारी - अध्यक्ष
२. उपविभागीय पोलीस अधिकारी - सदस्य
३. उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (संबंधीत कार्यक्षेत्राचे) - सदस्य

४. तहसिलदार- सदस्य
५. पोलीस स्टेशनचे ठाणेदार (संबंधीत कार्यक्षेत्राचे)- सदस्य सचिव
६. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (संबंधीत कार्यक्षेत्राचे) - सदस्य
७. पंचायत समितीमधील सर्व महिला लोकप्रतिनिधी- पदसिद्ध सदस्य
८. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा त्यांचे प्रतिनिधी-सदस्य

२. या समितीवर आणखी शासकीय/अशासकीय सदस्य नेमावयाचा असल्यास जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री यांच्याशी विचारविनिमय करून योग्य तो निर्णय घ्यावा.

३. समितीचे कार्यक्षेत्र फक्त तालुक्यापुरतेच मर्यादीत राहील. एका तालुक्यात एक अथवा जास्त पोलीस स्टेशन अस्तित्वात असल्यास सदर समिती संपूर्ण तालुक्यासाठी कार्यरत राहील. समितीचे कामकाज हे शासनाने अवैध दारु बंदीच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन होते अथवा नाही हे पाहणे असेल. अवैध दारु धंद्याबाबत पोलीस स्टेशन ठाणेदार व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना जबाबदार धरले जाईल.

४. समितीने महिन्यातून किमान एकदा न चुकता बैठक घ्यावी व तालुक्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये हातभट्टी दारु बंदीच्या निर्णयांचे काटेकोरपणे पालन होते अथवा कसे, याबाबत आढावा घेऊन हातभट्टीच्या दारुस संपूर्ण पायबंद चालण्यासाठी उपाययोजना कराव्यात. पोलीस महासंचालक व आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी अवैध दारु धंदयाना संपूर्ण पायबंद घालण्यासाठी त्यांचे स्तरावरुन त्यांचे अधिनस्त घटक कार्यालय प्रमुखांना त्वरीत आदेश निर्गमित करावेत. तसेच, या शासन निर्णयास स्थानिक वृत्तपत्रामध्ये सुयोग्य प्रसिध्दी देण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१११३०५१०६१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJARAM DATTAJIRAO SHIRKE

Digitally signed by RAJARAM DATTAJIRAO SHIRKE
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=2E761545D725564E8A0DF90E7EFD7C4E3B4CC95DCEB4C5E97A9E618006122C2C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EAA18D090E1B2C472311DC61B93D2E5D235855E03E54901120B82231950B9E01, cn=RAJARAM DATTAJIRAO SHIRKE
Date: 2026.05.11 13:05:56 +05'30'

**(राजाराम द. शिर्के)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
७. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
८. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

१०. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
११. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
१४. सर्व पोलीस आयुक्त (पोलीस आयुक्त बृहन्मुंबई वगळून)
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१६. सर्व विभागीय आयुक्त
१७. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
१८. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१९. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
२०. निवड नस्ती ( कार्यासन पोल-११).